



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६१६ . वा | शुक्रवार | दि. ०१ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महाभ्रष्टाचारी अविनाश कोठाळेंची सद्दी संपणार का?

# जिजाऊ बँकेची निवडणूक ठरू शकते परिवर्तनाची नांदी

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावती या संस्थेत चाललेला भ्रष्टाचार, नियमबाह्य कामे आणि हिटलरशाही कारभाराचा लवकरच दि एंड होण्याची शक्यता आहे. कारण लवकरच बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊ घातली आहे. निवडणूक जाहीर होताच बँकेचे अनेक सभासद, भागधारक तसेच बँकेशी निगडित लोक सोशल मीडियावर अनेक प्रश्न उपस्थित करीत आहेत. या प्रश्नांची उत्तरे देणे आगामी काळात कोठाळे यांना चांगलेच कठीण जाणार, यात काहीच शंका नाही. खरे तर ही निवडणूक महाभ्रष्टाचारी कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालकांची सद्दी संपवणारी निवडणूक ठरू शकते. पर्यायाने सद्य:स्थितीत कोठाळे व त्यांच्या लुटारू गँगच्या सर्वांचेच धाबे दणाणल्याचे पहायला मिळते आहे. बहुजन समाजाच्या हितासाठी आणि स्वराज्य प्रेरणा राजमाता माँ जिजाऊ यांचे नाव घेऊन सुरू करण्यात आलेली ही संस्था तिच्या स्थापनेपासूनच भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकलेली आहे. बँकेचे अनेक संचालक तसेच विद्यमान अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे हे सरकारी नोकरीत असतानाही आणि त्याना ही निवडणूक लढवण्याचा कोणताही अधिकार नसताना त्यांनी या संस्थेवर अनेक वर्षे काम केले. त्यासाठी आपल्याच वरिष्ठांची दिशाभूल देखील केली. ही तर नुसती सुरवात होती.

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग-१९६**

बँकेचे अध्यक्ष असताना कोठाळे यांनी अत्यंत मनमानी, हिटलरशाही आणि नियमबाह्य कामकाज करीत बँकेत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला. अवैधरित्या आपल्या मर्जीतील लोकांचा मोठ्या प्रमाणात भरणा केला. मर्जीतील लोकांना नियमबाह्य कर्जांचे वाटप केले. कोठाळे व त्यांच्या संचालकांच्या मर्जीतील लोकांना कर्ज वाटप करताना रिझर्व्ह बँकेचे किंवा सहकार खात्याचे स्र्व नियम धाब्यावर बसवण्यात आले. यातून बँकेला कोट्यवधी रुपयांचा चुना लागला. तसेच या कर्ज घोटाळ्यात कोठाळे व त्यांच्या चेलाचपाट्यांना मोठा लाभ झाल्याची खात्रिलायक माहिती आहे. अनेक कर्जदार व खातेदारांच्या खात्यात मोठा घोळ करण्यात आला. रिझर्व्ह बँकेची परवानगी नसताना कोठाळे यांनी मनमानी पद्धतीने बँकेची एटीएम सेवा सुरू केली. एक ना अनेक बँकिंग रूलची पायमल्ली केली. जे कर्जदार आपल्या मर्जीतील नाहीत त्यांच्या कर्जखात्यात मोठ्या प्रमाणात घोळ करण्यात आला. शेगाव येथील कर्जदार यांच्या घरावर तर अक्षरशः दिवसाढवळ्या दरोडा टाकण्यात आला. त्यांच्या घरातील स्त्रीधनासह विविध प्रकारचे साहित्य चोरून नेण्यात आले. त्याचा कोणताही हिशेब देण्यात आलेला नाही. बँकेच्या प्रोसिडिंग बुकातही मोठ्या प्रमाणात घोळ आहे. आज बँकेत मोठ्या प्रमाणात कर्जघोटाळा करण्यात आला असून, त्यातून बँकेला मोठा फटका बसला आहे. कारण कोठाळे यांनी घोटाळे करून मर्जीतील अनेकांना कर्जांचे वाटप केले. त्यात मोठा हेरफेर करण्यात आला आणि त्यातील बरेचसे कर्ज आज बुडित आहे. या प्रकारातून कोठाळे व त्यांच्या नालयक संचालकांनी अक्षरशः बँकेवर दरोडा टाकून आज बँक डबघाईला आणली आहे. विशेष म्हणजे एव्हढे सगळे घोटाळे होऊन देखील कोठाळे हे नाक वर करून छातीठोकपणे सांगत आहेत की, बँकेत एक रुपयाचा देखील घोटाळा नाही.



अध्यक्ष अविनाश कोठाळे
जिजाऊ कमर्शियल को ऑप बँक अमरावती

हे सर्व प्रकार अनेक वर्षे खपून गेले. परंतु सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने जेंव्हा यासंदर्भात भंडाफोड सुरू केला, तेंव्हा सरकारी यंत्रणेला जाग आली. नुकतीच बँकेची कलम ८९ अन्वये चौकशी करण्यात आली. या चौकशीत गंभीर प्रकार समोर आल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळेच पुन्हा एकदा बँकेच्या चौकशीची प्रक्रिया सुरू झाली आहे. तसेच बँकेची नव्याने निवडणूक घेण्याची प्रक्रिया सुरू होत आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी कोठाळे व त्यांची लुटारू गँग सर्व आटापीटा करणार, यात काहीच शंका नाही. परंतु बँकेच्या सूज्ञ भागधारकांनी आत्ताच योग्य तो निर्णय घेऊन या भ्रष्टाचारी गँगला बँकेतून हाकलून लावणे गरजेचे आहे. कारण असे न झाल्यास ही लुटारू गँग आगामी काळात बँकेला दिवाळखोरीत नेल्याशिवाय राहत नाही. निवडणूक आयोगाला देखील याबाबत सतर्क राहून नि:पक्ष व निर्भित वातावरणात ही निवडणूक घेणे गरजेचे आहे. असे झाल्यास माँ जिजाऊंच्या नावाने चालणारी ही संस्था पुन्हा एकदा बहुजन समाजाच्या विकासासाठी कार्यरत होऊ शकते. परंतु त्यासाठी आधी महाभ्रष्टाचारी कोठाळे व त्यांच्या लुटारू गँगला बँकेतून बाहेरचा रस्ता दाखवणे गरजेचे आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# मतदार नोंदणी वाढविण्यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचीही मदत घ्या
## मतदार यादी निरीक्षक डॉ. निधी पांण्डेय

**जनसंचलन/बुलढाणा**

दिनांक ०१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाकडून घोषित करण्यात आला असून, त्यानुसार जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचीही मतदार नोंदणीमध्ये मदत घेण्याचे निर्देश विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. निधी पांण्डेय यांनी आज येथे जिल्हा प्रशासनाला दिले. श्रीमती डॉ. पांण्डेय या मतदार यादी निरीक्षक म्हणून त्या बुलडाणा जिल्हा दौऱ्यावर आल्या असता, त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींसोबत चर्चा केली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, बुलढाणा जिल्ह्याचे समन्वय अधिकारी तथा अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (भूसुधार) श्यामकांत मस्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार रुपेश खंडारे यांच्यासह माजी आमदार दिलीपकुमार सानंदा व विविध पक्षाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमात विशेष शिबिरांमधून नव मतदारांची जिल्हा प्रशासन आणि निवडणूक विभाग नावनोंदणी करत आहेत. सोबतच जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींची या कामी मदत घेऊन नवमतदारांची नावनोंदणी वाढविण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. ही मतदार नोंदणी ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने करताना मतदान केंद्रप्रमुखांनी घरोघरी जावून एकही नवमतदार नावनोंदणी करण्यापासून सुटणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश डॉ. पांण्डेय यांनी दिले.

विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी यावेळी दुबार नोंदणी झालेली नावे वगळणी करणे, बोगस मतदारांची




नावे शोधणे, मृत मतदारांची नावे यादीतून कमी करणे, आठवडी बाजाराच्या दिवशी नाव नोंदणी करण्यासाठी केंद्र स्थापन करणे, नगरपालिका, मोठी खेडी, घन लोकसंख्या असलेली ठिकाणे शोधून तेथील सुटलेली मतदारांची नोंदणी करून घेण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. तसेच नव मतदारांकडून फॉर्म क्रमांक ६ भरून घेत नावनोंदणी करण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# मतदान नवीन मतदार नोंदणीवर विशेष भर द्या- विभागीय आयुक्त डॉ. निधी पांण्डेय

**जनसंचलन/बुलढाणा**

आगामी काळातील सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेता, सध्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदार यादी पुनरीक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे या विशेष मोहिमांच्या माध्यमातून जिल्ह्यातील जास्तीत जास्त नवीन मतदारांकडून फॉर्म क्रमांक ६ भरून घेत त्यांची नावनोंदणी करून घेण्यावर भर देण्याचे निर्देश मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त डॉ. निधी पांण्डेय यांनी जिल्हा प्रशासनाला आज येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय मतदार यादी पुनरीक्षणाच्या आढावा बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, सहाय्यक आयुक्त तथा समन्वय अधिकारी (भूसुधार) श्यामकांत मस्के, अपर जिल्हाधिकारी सुनील विंचनकर, अपर पोलीस अधीक्षक बाबुराव महामुनी, निवासी उपजिल्हाधिकारी सुनील थोरात, उपजिल्हाधिकारी शरद पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, समाधान गायकवाड, मनोज देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील तहसीलदार यावेळी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. निधी पांण्डेय यांची अमरावती विभागाच्या मतदार यादी निरीक्षक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांची ही पहिलीच बुलडाणा जिल्हा भेट आहे. दिनांक ०१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने त्यांनी आज ही भेट देत जिल्ह्यातील मोहिमेचा आढावा घेतला. आगामी काळात जिल्ह्यात सार्वत्रिक निवडणुकीच्या दृष्टीने भारत निवडणूक आयोगाकडून दि. १ जानेवारी २०२४ च्या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादी पुनरीक्षणाचा कार्यक्रम विशेष मोहीम स्वरुपात राबविण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा प्रशासन निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील जास्तीत जास्त नवयुवक आणि युवतींची मतदार यादीत नोंदणी करून घेण्यासाठी प्रयत्नरत राहण्यास सांगून विभागीय आयुक्त डॉ. पांण्डेय म्हणाल्या की, यंत्रणेने मतदारांची नावनोंदणी करताना मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी जेणेकरून जिल्ह्यातील एकही मतदार नावनोंदणी मोहिमेतून सुटणार नाही, असे त्यांनी सांगितले.

नवयुवक युवतींची मतदार यादीत नोंदणी करून घेण्यासाठी प्रशिक्षित केंद्र प्रमुखांच्या माध्यमातून सहायक निवडणूक अधिकारी यांनीही यामध्ये विशेष लक्ष घालून नावनोंदणी वाढविण्यावर भर द्यावा. जिल्हा निवडणूक यंत्रणेने घरोघरी जावून सर्व्हे करावा, शाळा महाविद्यालयांमध्ये, आठवडी बाजार येथे केंद्रप्रमुखांना पाठवून मतदार वाढविण्यावर विशेष भर देताना त्यांना उद्दिष्ट देण्याचे निर्देशही डॉ. पांण्डेय यांनी दिले. दोन दिवसांमध्ये मतदार यादी पुनरीक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी केंद्र प्रमुख आणि सहायक निवडणूक अधिकाऱ्यांनी आपल्या कामाची गती वाढविण्याचे निर्देश देत मलकापूर आणि खामगाव तालुक्यांवर विशेष लक्ष देण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना सांगितले. जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये अपेक्षित नवमतदारांची नोंदणी झाली नसल्यामुळे विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. पांण्डेय यांनी पुनरीक्षणाच्या या कार्यक्रमामध्ये अधिकाऱ्यांनी अधिक वेगाने ही प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले.

बुलडाणा विधानसभा मतदारसंघात नवीन मतदार यादी नोंदणी समाधानकारक झाल्याबद्दल त्यांचे अनुभव आणि पद्धती, त्यासाठी घेतलेल्या विशेष मेहनतीबाबत उपस्थित इतर अधिकाऱ्यांना माहिती देण्याच्या सूचना केल्या. जिल्हा प्रशासनाकडून नवमतदार नोंदणी करण्याबाबत माध्यमांमधून सातत्याने जनजागृती करण्यात येत असून, प्रशासन पातळीवर शाळा-महाविद्यालयांमध्ये, आठवडी बाजार, महिला बचत गटांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याचे




जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सांगितले. तसेच दर गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत आढावा बैठक आयोजित करून त्यांच्याकडून काही सूचना आल्या असल्यास त्यावर अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले. याशिवाय महाविद्यालयीन वसतीगृहात राहणाऱ्या मुलीकडून महाविद्यालयाचे ओळखपत्र किंवा त्यांचा वसतीगृहाचा राहण्याचा पुरावा ग्राह्य धरून त्यांचीही मतदार यादीत नाव नोंदणी करत असल्याबाबत त्यांनी सांगितले. तसेच यावेळी जिल्ह्यातील ज्या विधानसभा मतदारसंघांमध्ये नवमतदार नोंदणी कमी झाली आहे, त्यांची कारणे शोधून त्यावर अधिक जबाबदारीने काम करण्यात येईल, असे सांगून तहसीलदार, केंद्रप्रमुखांनी अधिक गतीने मतदारयादी अद्यावत करण्यात येतील, असे सांगितले. मतदारनोंदणी करताना केंद्र प्रमुख स्तरावर दोन दिवसांपेक्षा जास्त कालावधीपर्यंत फॉर्म क्रमांक ६ पडून राहता कामा नयेत, असे सांगून त्यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्याचे आदेशही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सुहासिनी गोणेवार यांनी सादरीकरणाव्दारे जिल्ह्यातील नवीन मतदार यादी पुनरिक्षणाबाबत उपस्थितांना माहिती दिली.

# तरुणीचे फोटो इंस्टाग्रामवर अपलोड करुन बदनामी करणा-या आरोपीच्या बुलढाणा सायबर विभागाने आवळ्या मुसक्या...

**जनसंचलन/बुलढाणा**



तरुणीचे फोटो इंस्टाग्रामवर अपलोड करून बदनामी करणाऱ्या आरोपीला दि २८ नोव्हेंबर रोजी बुलढाणा सायबर विभागाने बेड्या ठोकल्या आहे. सविस्तर वृत्त असे कि दि ९ नोव्हेंबर रोजी अज्ञात आरोपीने अमडापूर पास्टे हददीत राहणाऱ्या तरुणीचे फोटो इंस्टाग्रामवर अपलोड करून तिची बदनामी केल्याबद्दल पिडीत तरुणी वय १९ वर्ष हिने दिलेल्या तक्रारीवरुन पो स्टे सायबर बुलढाणा येथे आप क्र ४९/२०२३ कलम ५०० आयपीसी आर/डब्ल्यू ६० (सी) आयटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पोलीसांनी तांत्रीक पध्दतीने तपास करून पिडीत तरुणीचे फोटो इन्स्टाग्रामवर अपलोड करणारा आरोपी निष्पन्न करुन टाकरखेड हेलगा ता. चिखली येथील आरोपी वय २६ वर्ष याचेवर माहिती व तंत्रज्ञान कायद्या अंतर्गत कार्यवाही करण्यात आली.

हि कार्यवाही कर्तव्यदक्ष जिल्हा पोलिस अधिक्षक सुनित कडासने, अप्पर पोलिस अधिक्षक बी बी महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सायबर पो. स्टे सारंग नवलकार, सपोनि सुनिल सोळुंके, पहिको कृणाल चव्हाण, पोना मंदीप राऊत, राजदीप वानखडे, पोको स्पोकेश खंडेराब,चालक पोहेको अविनाश यांनी केली आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

वित्तं देहि गुणान्वितेषु ।

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हा सामान्य रुग्णालयात अवघ्या चार वर्षाच्या चिमुकल्या बालकाची मानाची डॉ ऋषीकेश निकम व त्यांच्या टिमने केली यशस्वी शस्त्रक्रिया...

## अति जोखीमची असलेली हि शस्त्रक्रिया डॉ निकम आणि त्यांच्या टिमने करून दाखविली...



जनसंचलन/बुलढाणा

असे म्हटले जाते की जगात देव-चे दुसरे रूप बघायचे असेल तर ते असते डॉक्टर कारण यांच्यामध्ये ते रूप दिसून येते असे कारण की माणसाला सुखरूप आणि व्यस्थित करण्याचे काम ते करत असतात.असे बऱ्याच ठिकाणी दिसून येते. जिल्हा सामान्य रूग्णालय येथे सुध्दा असे काही दिसून आले आहे. अवघ्या चार वर्षाच्या बालकाची जन्मताच मान वाकडी होती. गेल्या चार वर्षापासून हा बालक त्रस्त होता. खुप त्रास हा त्याला सहन करावा लागत होता. मात्र या त्रासाला डॉ निकम व डॉ विरेंद्र काटकर व त्यांच्या टिमने पुर्णविराम दिला आहे. जिल्हा सामान्य रूग्णालय येथे दि २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास हि यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. चार वर्षाच्या या बालकाची मान हि जन्माताच वाकडी होती. याला टॉर्टिकोलीस असे म्हणतात. टॉर्टिकोलीस म्हणजे जन्मता मानेची स्नायू अकुंचन पावल्यामुळे मान एकाबाजूला वाकून मानेची हालचाल मंदावते त्यामुळे पेशंटला प्रचंड त्रास सहन करावा लागतो. प्रणव भिसे असे या चार वर्षीय बालकाचे नाव असून त्याच्यावर जिल्हा सामान्य रूग्णालय येथे हि यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. हि अति जोखीमची मानेची शस्त्रक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सुभाष चव्हाण सर व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ राठोड सर यांच्या मार्गदर्शनाखाली अस्थिरोग तज्ञ डॉ ऋषीकेश निकम, अस्थिरोग तज्ञ डॉ विरेंद्र काटकर,भुलतज्ञ डॉ सुर्वणा सरोदे, डॉ. अविनाश सोळके व सर्व ओटी स्टाफ यांनी हि यश स्वी शस्त्रक्रिया केली आहे. यावेळी चिमुकल्या बालकाच्या कुटुंबीयांनी डॉक्टरांचे आभार मानले.

# नमो राज्यस्तरीय महारोजगार मेळाव्यासाठी नावनोंदणी करा - सहायक आयुक्त प्रवीण खंडारे

जनसंचलन/बुलढाणा

राज्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविण्यता विभागाद्वारे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार योजनेतून नमो राज्यस्तरीय महारोजगार मेळाव्याचे नागपूर येथे ९ व १० डिसेंबर २०२३ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून तरुणांना रोजगार प्रदान करण्याचे काम शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता विभागाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या निर्देशाप्रमाणे दोन दिवसीय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरातून विविध क्षेत्रातील किमान १०० कंपन्या या महारोजगार मेळाव्यात सहभागी होणार आहेत. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील कुशल मनुष्यबळाची गरज असेलल्या कंपनी, उद्योजक आस्थापनांनी महारोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होऊन रिक्तपदांबाबतची माहिती .... या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदवावी. त्यामुळे आवश्यक असणा-या मनुष्यबळाची मागणी तातडीने पूर्ण होण्यास मदत होईल, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्रवीण खंडारे यांनी केले आहे. नोकरी इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करावी व मेळाव्यात स्वखर्चाने प्रत्यक्षपणे सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी ०७२६२-२४२३४२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे ७ डिसेंबरपासून

वृत्तसंस्था/मुंबई

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे गुरुवार दि. ७ डिसेंबर २०२३ पासून सुरू होणार आहे. आज विधानभवन मुंबई येथे विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. यावेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर,विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील विधानसभा विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार,मंत्री, दोन्ही सभागृहाचे सदस्य,विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे संबंधित मान्यवर उपस्थित होते. हिवाळी अधिवेशन गुरुवार दि. ७ डिसेंबर २०२३ ते बुधवार दि.२० डिसेंबर २०२३ या कालावधीत पार पडणार आहे. अधिवेशनाचे एकूण दिवस १४ (सुट्ट्यासह) प्रत्यक्ष कामकाज १० दिवस, सुट्या(शनिवार व रविवार) ४ दिवस.

# मातृतीर्थ नगरीत गुंजला वन बुलढाणा मिशनचा आवाज

## संदीप शेळके यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांची तहसीलवर धडक...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीत ३० नोव्हेंबर रोजी वन बुलढाणा मिशनचा आवाज गुंजला. संदीप शेळके यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांनी तहसीलवर धडक दिली. शेतकऱ्यांना तत्काळ नुकसानभरपाई द्यावी यासह इतर मागण्यांचे निवेदन देण्यात आले. प्रारंभी राजमाता जिजाऊ यांना अभिवादन करण्यात आले. राजवाडा ते तहसील कार्यालय रॅली काढण्यात आली. धडक मोर्चा नंतर झालेल्या जन आंदोलन सभेत बोलताना संदीपदादा शेळके यांनी राज्य सरकार व सत्ताधारी लोकप्रतिनिधी यांच्यावर टीकास्त्र सोडले. झालेले प्रचंड नुकसान पाहता पंचनामे, सर्वेक्षण, पाहणी पर्यटन सारखी शोबाजी न करता शेतकऱ्यांच्या खात्यात सरसकट मदत जमा करा, असे आवाहन त्यांनी केले.

सोलर पॅनल नुकसानीसाठी १ लाखाची अतिरिक्त मदत द्या, शेडनेट नुकसानीचा एनडीआरएफमध्ये समावेश करावा, शेडनेट नुकसानग्रस्त शेतकऱ्याला १ लाख रुपये द्या , नुकसंग्रस्तना बागायतीसाठी एकरी ५० हजार, कोरडवाहूसाठी एकरी २५ हजार तत्काळ मदत द्या, आदी मागण्यांसाठी सिंदखेडराजा तहसिलवर हे आंदोलन करण्यात आले. राजमाता जिजाऊ जन्मस्थळ ते तहसील कार्यालय असा धडक मोर्चा काढण्यात आला. तहसिलदारांना निवेदन देण्यात आल्यावर परिसरात सभा घेण्यात आली. यावेळी बोलतांना शेळके यांनी सरकार व सत्ताधारी लोकप्रतिनिधी यांच्यावर टीकेची झोड उठविली. ओल्या दुष्काळात राजकारणाचा सुकाळ न करता सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना तात्काळ मदतीची मुख्यमंत्री कडे मागणी करणे काळाची गरज आहे. अवकाळीने झालेले नुकसान प्रचंड आहे. खरीप हातचा गेल्यावर रब्बी वर देखील निसर्गाने घाला घातला आहे. त्यामुळे निकष व पंचनामे याचा खेळ न करता शेतकऱ्यांना मदत करून त्यांचे अश्रू पुसण्याची गरज आहे. खोडा( अनधिकृत) खरेदी करून शेतकऱ्यांची लाखोंची फसवणूक झाल्याच्या घटना घडल्या आहे. याची नोंद बाजार समित्याकडे असणे बंधनकारक करावे व फसवूनिकीचे खटले फास्ट ट्रक न्यायालयात चालवावे.



फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांची संपत्ती जप्त करून शेतकऱ्यांची रक्कम चुकती करण्यात यावी अशी मागणीही शेळके यांनी केली. या आंदोलनात शेतकरी, कार्यकर्ते बहुसंख्येने सहभागी झाले. यावेळी संदीपदादानी पॉली हाऊस आणि शेडनेट धारकांच्या व्यथा मांडल्या. सरकार एकीकडे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा उपदेश करते पण नैसर्गिक आपत्तीत पॉली हाऊस आणि शेडनेट धारकासाठी मदतीची कोणतीच तरतूद नाही . मुळात एनडीआरएफ मध्ये त्यांच्या भरपाईची तरतूदच नाही. त्यामुळे त्यांचे लाखोंचे नुकसान झाले असले तरी मदत मिळणार नाहीये. जिल्ह्यातील नेत्यांना याची माहिती आहे का आणि ते यावर आवाज उठविणार काय? असा रोखठोक सवाल त्यांनी यावेळी केला.

# उमरद येथे महात्मा फुले पुण्यतिथी साजरी

जनसंचलन/सिंदखेडराजा



तालुक्यातील उमरगा येथे २८ नोव्हेंबरला स्त्री शिक्षणाचे प्रवर्तक महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी ग्रामपंचायत कार्यालयात साजरी करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला सरपंच निर्मला पंढरीनाथ उबाळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रभाकर देशमुख, विठ्ठल भांबर्गे, अरुण घायवट, संतोष गिरी, पंढरीनाथ उबाळे, मनोहर देशमुख, आनंदीबाई शिनगारे, मुक्ताबाई मुळे, शारदा गिरी, कासाबाई सानप, सचिव विनोद सातपुते, यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी संजय कारभारी मुळे, संजय साहेबराव मुळे, देविदास खजुरे हजर होते

# मनोज जरांगे लहान, त्यांना अजून अभ्यासाची गरज, मराठे कधीच ओबीसीतून आरक्षण घेणार नाहीत: नारायण राणे

वृत्तसंस्था/ पुणे

मराठा समाजातील अनेकजण गरीब आहेत. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण हे मिळाले पाहिजेच. परंतु, ओबीसी समाजाच्या वाट्याचं आरक्षण काढून ते मराठ्यांना देऊ नये, या मताचा मी आहे, असे वक्तव्य केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केले. कुठल्याही राजकीय नेत्याने मराठा आणि ओबीसी अशी झुंज लावू नये. माझ्या काळात मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्यात आले होते. पण ते ओबीसींचं काढून दिले नव्हते, असे नारायण राणे यांनी म्हटले. ते गुरुवारी पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी नारायण राणे यांना राज्यात सुरु असलेल्या मराठा विरुद्ध ओबीसी वादाबाबत विचारणा करण्यात आली. यावर नारायण राणे यांनी म्हटले की, कुठल्याही राजकीय नेत्याने मराठा ओबीसीची झुंज लावू नये, या मताचा मी आहे. मी मराठ्यांना आरक्षण दिले होते, पण ते ओबीसींचे काढून दिले नव्हते. ५२ टक्क्यांपुढे भारतीय घटनेनुसार सर्वेक्षण करुन एखाद्या समाजाला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक आरक्षण देण्याचा हक्क राज्य सरकारला आहे. त्यानुसार मी मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिले होते. पण ओबीसी समाजाचं आरक्षण काढून मराठा समाजाला ते देण्यात यावे, या मताचा मी नाही. मराठ्यांना आरक्षण हे मिळालेच पाहिजे, मराठ्यांमध्ये अनेकजण गरीब आहेत, असे नारायण राणे यांनी म्हटले.मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला मराठा आरक्षणासाठी २४ डिसेंबरची डेडलाईन दिली असून ते आक्रमकपणे आपली भूमिका मांडत आहेत. याविषयी नारायण राणे यांना विचारले असता त्यांनी म्हटले की, मनोज जरांगे यांनी अजून आरक्षणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ते अजून लहान आहेत. वेगवेगळ्या जाती-धर्मांना आरक्षण कसं मिळतं, त्यासाठी घटनेत काय तरतुदी आहेत, याचा



अभ्यास मनोज जरांगे पाटील यांनी करावा. मराठ्यांना विचारावं, ते ओबीसी आरक्षण घ्यायला तयार आहेत का? मराठा ओबीसीतून आरक्षण कधीच घेणार नाहीत, असे नारायण राणे यांनी म्हटले.

# अवकाळीचा पिकांना तडाखा; शेतकरी संकटात, राज्यात एकत्रित पंचनामे करण्याचे - मुख्यमंत्र्यांचे आदेश...



वृत्तसंस्था/मुंबई

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नसून तीन हेक्टरपर्यंत नुकसानभरपाई देण्यात येईल, यासाठी महसूल, कृषी विभागाने तातडीने कालबद्ध रीतीने एकत्रितरीत्या सर्व जिल्ह्यांचे पंचनामे पूर्ण करावेत, असा आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिला. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये गेल्या दोन दिवसांत अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे शेती आणि फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुमारे एक लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील या संदर्भात प्रशासनाने युद्धपातळीवर काम करावे अशा सूचना दिल्या. मदत व पुनर्वसन; तसेच कृषी विभागाने अवकाळी पाऊस आणि गारपिटीबाबत मंत्रिमंडळापुढे सादरीकरण केले. पंचनामे प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे तातडीने करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी क्षेत्रीय यंत्रणांना द्यावेत आणि ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणी निधी मागणीचा प्रस्ताव तत्काळ सरकारकडे पाठवावा, असे निर्देश महसूल व वन (आपत्ती व्यवस्थापन) विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना मंगळवारीच दिल्याची मंत्रिमंडळाने नोंद घेत-ली.राज्यातील बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्यासाठी निधी मागणीचे प्रस्ताव सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त करून घेऊन निधी वितरित करण्याच्या एकत्रित प्रस्तावावर विभागाने तातडीने निर्णय घ्यावा, असे निर्देश मंत्रिमंडळाने दिले. धुळे जिल्ह्यात ४६ हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई, कापूस, हरभरा पिकाचे, नंदुरबार जिल्ह्यात दोन हजार २३९ हेक्टर क्षेत्रातील भात, कापूस, तूर, मिरची, मका, कांदा पिकांचे, जळगाव जिल्ह्यात ५५२ हेक्टर क्षेत्रातील कांदा, हरभरा, गहू, मका, ज्वारी व फळपिकांचे नुकसान झाले. बुलढाणा जिल्ह्यात ३३ हजार ९५१ हेक्टर क्षेत्रातील भाजीपालाचे नुकसान झाले आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड हे तालुके बाधित असून, यातील ५३ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे. पालघर जिल्ह्यात ४१ हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे, नाशिक जिल्ह्यात ३२ हजार ८३३ हेक्टर क्षेत्रातील कांदा, द्राक्ष, सोयाबीन, मका, गहू, ऊस व फळपिके आदींचे नुकसान झाले आहे. पुणे जिल्ह्यात तीन हजार ५०० हेक्टर क्षेत्रातील द्राक्ष, कांदा पिकांचे नुकसान झाले आहे. नगर जिल्ह्यात १५ हजार ३०७ हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई, मक्याचे; तर सातारा जिल्ह्यात १५ हेक्टर क्षेत्रातील भात पिकाचे नुकसान झाले आहे.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ४ हजार २०० हेक्टर क्षेत्रातील केळी, पपई व मका पिकांचे, जालना जिल्ह्यात पाच हजार २७९ हेक्टर क्षेत्रातील द्राक्ष, केळी, कांदा, खरीप ज्वारी, गहू व हरभरा पिकांचे; तसेच बीड जिल्ह्यात २१५ हेक्टर क्षेत्रा-तील कांदा, ज्वारी, भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे. हिंगोली जिल्ह्यात १०० हेक्टर क्षेत्रातील भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे. परभणी जिल्ह्यात एक हजार हेक्टर क्षेत्रातील रब्बी ज्वारी, कापूस, सीताफळ, पेरू, भाजीपाला या पिकांचे नुकसान झाले आहे, नांदेड जिल्ह्यात ५० हेक्टर क्षेत्रातील केळी पिकाचे नुकसान झाले आहे.






## मतदान केंद्रांची डॉ. निधी पांण्डेय यांच्याकडून पाहणी

जनसंचलन/बुलढाणा

०१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाकडून घोषित करण्यात आला असून, विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. निधी पांण्डेय यांनी बुलडाणा जिल्हा दौऱ्यावर आल्या असता, शहरा-तील मतदान केंद्रांची पाहणी केली.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, बुलढाणा जिल्ह्याचे समन्वय अधिकारी तथा अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (भूसुधार) श्यामकांत मस्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार रुपेश खंडारे यावेळी उपस्थित होते. विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. पांण्डेय यांनी श्री. शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील मतदान केंद्र क्रमांक १८२, १८३ आणि १८४ची पाहणी करत केंद्रप्रमुखांकडून मतदार यादी पुनरीक्षण आणि नवीन मतदार नावनोंदणी, वगळणी, मतदान केंद्रांवर मतदानाच्या दिवशी उप-लब्ध करून देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांबाबत चर्चा केली. तसेच जिजामाता महाविद्यालय येथील मतदान केंद्रांचीही पाहणी करत पुनम अवसरमोल यांच्याकडून मतदार यादी पुनरीक्षणाबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती जाणून घेतली तसेच मतदार यादीत नवीन मतदारांची नावनोंदणी करण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. विभागीय आयुक्त डॉ. पांण्डेय यांची मतदार यादी निरीक्षक म्हणून ही पहिलीच बुलडाणा जिल्हा भेट असून, त्या अनुषंगाने त्या अजून दोन भेटी देणार आहेत.